**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. १९१/२०१४**

**निशाणी ६४ लगत आदेश**

( रुक्मीणी विरुध्द प्रल्हाद व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी ८ यांनी त्यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, सदर दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स प्राप्त झालेवर ते दि. ०५/०१/२०१५ रोजी वकीलांमार्फत हजर झाले होते. परंतु प्रतिवादी हे मुंबई येथे नोकरी व व्यवसायासाठी काम करीत असून त्यांना कोर्टात हजर राहणे शक्य झाले नाही. तसेच त्यानंतर कोरोना विषाणुमुळेही प्रतिवादी यांना न्यायालयात हजर रहाता आले नाही. प्रतिवादी यांना कैफियत देण्यास ९ वर्षे विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ होणे आवश्यक आहे. सदरचा विलंब माफ न झाल्यास प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे व प्रतिवादींचा अर्ज नाकारला आहे. वादीचे कथन की, अर्जातील मजकुर खोटा आहे. वादीचा पुरावा बंद झालेला आहे. केवळ दाव्याचे काम लांबणीवर टाकण्यासाठी अर्ज दिलेला आहे. त्यामुळे

अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी यांच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्यांच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. ८ यांनी **रु. २,०००/–** दंड देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी खर्चाचे रकमेपैकी रु. १,०००/– शासन नावे न्यायालयात जमा करावेत व उर्वरित रु. १,०००/– वादी यांना अदा करावेत.

३. सदर आदेशाची पुर्तता केलेवर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2024.11.28 10:44:30 +0530

सांगोला. (श्री. संजय मो. घुगे)

दिनांक – २६/११/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 26/11/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 27/11/2024 |